## गैरवापर रोखण्यासाठी भारत, अमेरिका, युरोप देशांकडून कायद्यांची निर्मिती

# टेक कंपन्यांच्या मक्तेदारीला ब्रेक

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. वर्षानुवर्ष मक्तेदारीचा चुकीचा वापर करणाऱ्या अनेक दिग्गज टेक कंपन्या हळूहळू त्यांच्याच जाळ्यात अडकू लागल्या आहेत. भारत, अमेरिका, युरोपियन युनियनमधील देश, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया यासह जगभरातील सरकार इंटरनेट इकोसिस्टममध्ये पुन्हा लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी आयटी क्षेत्रातील दिग्गज कंपन्यांवर कारवाई करत आहे. आयटी कंपन्यांच्या एकाधिकार पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्या अनुषंगाने कायदे निर्माण करण्याचे काम या देशांनी हाती घेतले आहे. त्यामुळे या कंपन्यांची मक्तेदारी संपुष्टात येणार आहे. कायद्याच्या माध्यमातून या कंपन्यांवर वचक ठेवण्याचा प्रयत्न राहणार आहे. नवीन कायद्यात नियमांचे उल्लंघन केल्यास शिक्षेसह दंडाची तरतूद करण्यात येणार आहे. यामुळे आगामी काळात या कंपन्यांचे वर्चस्व राहणार नाही.

**अमेरिकेत दोन विधेयके**

**आणण्याची तयारी :** अमेरिकेत 'द अमेरिकन इनोव्हेशन अँड चॉईस ऑनलाइन ॲलक्ट' आणि 'ओपन ॲबप मार्केट्स ॲक्ट' अशी दोन विधेयके तयार करण्याची तयारी सुरू आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गजांना त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करण्यापासून रोखण्यासाठी ही विधेयके आणली जात आहेत. विधेयकांना मंजूरी मिळाल्यास, ही विधेयके युएसमधील बिग टेकच्या वर्चस्वाला लक्ष्य करणारे आतापर्यंतचे सर्वात मजबूत कायदे बनतील. जे वृत्त माध्यम संस्थांना गुगल आणि फेसबुकसारख्या टेक दिग्गजांसह महसूल सामायिकरण मॉडेलची वाटाघाटी करण्यास सक्षम करते.

**मिशनवर ४० तज्ज्ञांची टीम**

युरोपियन युनियनकडून असेही जाहीर करण्यात आले की, बिग टेक कंपन्यांना त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करण्यापासून रोखण्यासाठी मजबूत डिजिटल मार्केट ॲक्क्ट (डीएमए) नियम लागू करण्यासाठी ४० तज्ज्ञांची क्रॅक टीम तयार करण्याच्या मोहिमेवर आहे. अल्फाबेट, मेटासह अनेक दिग्गज आयटींचा समावेश आहे. या कंपन्या विविध माध्यमातून वर्षाला अब्जावधींचा महसूल गोळा करीत आहे. यांना कायद्याच्या चौकटीत आणण्याची तयारी सुरू झाली आहे.

### पारदर्शकतेला प्राधान्य, दंडाची तरतूद

बातम्यांसाठी वाजवी पेमेंट नाकारणे, स्पर्धकांना दूर करण्यासाठी कार्टेल तयार करणे, अपारदर्शक आणि अनियंत्रित व्यवसाय पद्धती, ॲप आणि पेमेंट मार्केटप्लेसचा गैरवापर, ग्राहकांचा विश्वास तोडणे, डेटाचा गैरवापर यासारख्या मक्तेदारी पद्धती असून त्या संपुष्टात आणण्याची योजना आहे. संपूर्ण इंटरनेट स्पेसवर वर्चस्व गाजवण्याची प्रवृत्ती मोडीस काढणे नवीन कायद्याचे उद्दिष्ट असणार आहे. आघाडीवर राहिलेल्या गुगलला आता अनेक अविश्वास खटले आणि आर्थिक दंड यांनी घेरले आहे. अलीकडेच भारतात, भारतीय स्पर्धा आयोगाने (सीसीआय)अँड्रॉइड ओएस आणि अँड्राईड मोबाइल ॲप स्टोअर स्पेसमध्ये आपल्या पदाचा गैरवापर केल्याबद्दल अल्फाबेटच्या मालकीच्या कंपनीवर एकूण २,२७४ कोटी रुपयांचे दोन दंड ठोठावले आहेत.



### गुगलची चौकशी सुरू

सीसीआय अनेक प्रकरणात गुगलची चौकशी करत आहे. भारतीय न्यूज पेपर असोसिएशन , न्यूज ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल असोसिएशन आणि डिजिटल न्यूज पब्लिशर्स असोसिएशन यांनी अलीकडच्या काळात नोंदवलेल्या तक्रारींच्या आधारे ही चौकशी सुरू झाली आहे. गुगल न्यूज फीडवर प्रकाशित मजकूर प्रदर्शित होत असतानाही भारतातील देशांतर्गत वृत्त माध्यम कंपन्यांसोबत महसूल सामायिक न करण्याबद्दल त्यांच्या तक्रारी आहेत.



बिग टेक दिग्गजांच्या अशा पद्धती थांबवण्याच्या भारताच्या निर्णयासाठी कायदे आणि नियम तयार करणे आवश्यक आहे. मंत्रालय बुलेटप्रूफ डिजिटल लँडस्केप तयार करण्यासाठी किमान 20 देशांच्या आयटी नियमांचा अभ्यास करत आहे. या कंपन्यांचे वर्चस्वाला लगाम घालून डेटाचा गैरवापर रोखण्यासाठी कायद्यात तरतूदी असेल. आयटी कायद्यात बदल करून मसुदा फ्रेमवर्क २०२३ मध्ये आणला जाऊ शकतो.

**- राजीव चंद्रशेखर, केंद्रीय राज्यमंत्री**

## एसएनके कंपनीवर आयकरचा छापा

**लखनौ.** कानपूरमधील एसएनके पान मसाला कारखान्याच्या मालकांच्या घरावर मंगळवारी सकाळी आयकर विभागाने छापा टाकला आहे. यासोबतच, दिल्लीतील समूहाच्या रिअल इस्टेट व्यवसायाच्या ठिकाणांवर कारवाई करण्यात येत आहे. मागील वर्षी जून २०२१ मध्ये देखील आयकर विभागाने बनावट कंपन्यांकडून निधी हस्तांतरणाबाबत मोठ्या प्रमाणावर छापेमारी केली होती. बोगस कंपन्यांच्या वेशात काळ्या पैशाचा मोठ्या प्रमाणात उपभोग घेण्यासाठी ही तपासणी करण्यात आली. लखनौ, कानपूर आणि दिल्लीतील कुरेले ग्रुपच्या पुन्हा छापे टाकण्यात आले आहेत.

## आरबीआयने ९ बँकांना ठोठावला १२ लाख दंड

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. भारतीय रिझर्व्ह बँकेने विविध बँकिंग नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल नऊ सहकारी बँकांना सुमारे १२ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. आरबीआयने निवेदनाद्वारे ही माहिती दिली.

**CHANGE IN NAME AND DOB**

I, TANDLE SUDARSHAN SON OF JC-325846L SUBEDAR MAJOR TANDLE MUKUND GINAYANDEO CHANGED MY NAME FROM TANDLE SUDARSHAN TO SUDARSHAN TANDLE I CHANGED MY WRONG DOB 25 JUN 2003 TO CORRECT DOB 24 JUN 2003 AFFIDAVIT NO. A7738/2022 DATED : 15/11/2022

**CHANGE IN NAME AND DOB**

I, MANISHA TANDLE WIFE OF JC-325846L SUBEDAR MAJOR TANDLE MUKUND GINAYANDEO CHANGED MY NAME FROM MANISHA TANDLE TO TANDLE MANISHA. I CHANGED MY WRONG DOB 25 MAR 1974 TO CORRECT DOB 25 DEC 1973 AFFIDAVIT NO. A7739/2022 DATED : 15/11/2022.

### पुणे महानगरपालिका
**मोटार वाहन विभाग**
**मुदतवाढ (रीटेंडर)**

पुणे महानगरपालिकेच्या खाली नमुद केलेल्या विभागांकडील कामांना मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर कामाबाबतच्या निविदा अटी, शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संच मध्ये नमुद केलेला आहे. व निविदा संच Online वर निशुल्क पहावयास उपलब्ध आहे.

टेंडर विक्री कालावधी : दिनांक : १६/११/२०२२ ते २३/११/२०२२ दु. २:३० पर्यंत
टेंडर स्विकृती कालावधी : दिनांक : १६/११/२०२२ ते २३/११/२०२२ दु. २:३० पर्यंत
टेंडर उघडणे कालावधी : दिनांक : २५/११/२०२२ दु. ३:३० पर्यंत

| अ.क्र. | खात्याचे नाव | मुदतवाढ टेंडर क्रमांक |
|---|---|---|
| १. | मोटार वाहन विभाग | PMC/VEHICLE/2022/140, PMC/VEHICLE/2022/147 |

१) वरील टेंडर्सची विक्री व स्विकृती www.punecorporation.org व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर फक्त ऑनलाईन चालू आहे.
२) बाकी सर्व मजकूर पूर्वी प्रसिद्ध केल्या प्रमाणे कायम राहील.

जाहिरात क्र. १/८९० दि. १५/११/२२

सही/-
कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
मोटार वाहन विभाग, पुणे महानगरपालिका

**# QUICK NEWS**

### एसबीआयचे कर्ज पुन्हा महागणार

**मुंबई.** एसबीआयने १५ नोव्हेंबरपासून सर्व कालावधीसाठी एमसीएलआर आधारीत कर्ज ०.१० ते ०.१५ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार कर्जदारांसाठी १ महिना आणि ३ महिन्याचा एमसीएलआर १५ आधार अंकांनी वाढून ७.६० टक्क्यांवरून ७.७५ टक्क्यांपर्यंत करण्यात येणार आहे. ६ महिने आणि १ वर्षासाठी एमसीएलआर अनुक्रमे ८.०५ टक्क्यांपर्यंत करण्यात येणार आहे. २ वर्ष आणि ३ वर्षीय एमसीएलआर अनुक्रमे १०-१० आधार अंकांनी म्हणजेच ८.२५ टक्के आणि ८.३५ टक्क्यांपर्यंत वाढले आहे. ओव्हरनाईट एमसीएलआरमध्ये बदल झालेला नाही आणि तो ७.६० टक्क्यांवर कायम आहे.

**दिलासा ● आरबीआय गव्हर्नर शक्तीकांत दास यांची माहिती**

## तिमाहीत पुन्हा महागाई घसरणार

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. रिझर्व्ह बँकेने आणि अर्थ मंत्रालयाने केलेल्या आक्रमक उपाययोजनामुळे किरकोळ आणि घाऊक महागाई नियंत्रणात आली असून आगामी तिमाहीत महागाई पुन्हा घसरण होणार असल्याची माहिती एका कार्यक्रमात आरबीआयचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांनी दिली आहे. ते म्हणाले, ऑक्टोबरमध्ये किरकोळ महागाईचा दर केवळ ६.७७% मोजला गेला आहे. सप्टेंबर महिन्यात हा दर ७.४१% इतका होता. त्याअगोदर महागाईचा दर त्यापेक्षा जास्त होता. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने प्रयत्न सुरू केले होते. आता किरकोळ महागाईचा दर दहा महिन्याच्या निचांकावर असला तरी अजूनही तो ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा म्हणजे सहा टक्क्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे आगामी काळातही परिस्थितीकडे बारीक लक्ष ठेवण्याची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. १९ महिन्यापासून घाऊक किंमतीवर आधारित महागाईचा दर १०% पेक्षा जास्त होता. त्यामुळे किरकोळ किमतीवर आधारित महागाई वाढत होती. इंधन आणि मॅनुफॅक्चरिंग क्षेत्रातील वस्तूचे दर कमी होत असल्यामुळे ही महागाई कमी झाली आहे. सप्टेंबर महिन्यात या महागाईचा दर १०.१९ टक्के इतका होता. धातू आणि इतर मॅन्युफॅक्चरिंग वस्तूच्या किमती वेगाने कमी होत आहेत. तर उत्पादनाने वेग पकडला आहे. घाऊक महागाई कमी झाल्यानंतर त्या तुलनेत किरकोळ किंमतीवर आधारित महागाई कमी होत असते. त्यामुळे एकूणच महागाई कमी होण्याचे वातावरण सध्या निर्माण झाले आहे. डॉलरच्या तुलनेत गेल्या काही महिन्यांपासून रुपयात मोठी घसरण सुरू आहे.

### सहा टक्क्यांचे लक्ष्य



रिझर्व्ह बँकेने महागाई कमी करण्यासाठी मे महिन्यापासून आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत. त्यामुळे आता महागाई कमी होण्याची लक्षणे दिसून येत असून ऑक्टोबर महिन्यात महागाई सात टक्क्यांपेक्षा कमी झालेली असेल असा विश्वास रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी म्हटले होते. सरकारने रिझर्व्ह बँकेला महागाई दोन ते सहा टक्क्याच्या दरम्यान ठेवण्याची सूचना केलेली आहे. मात्र गेल्या नऊ महिन्यापासून या महागाईचा दर ६% पेक्षा जास्त आहे. त्यामुळे हे उद्दिष्ट बदलावे का अशी चर्चा सुरू असताना त्यांनी सांगितले की, अपवादात्मक परिस्थितीमुळे ही महागाई वाढली होती.

## ॲमेझॉनचा १० हजार कर्मचाऱ्यांना नारळ

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. जगातील सर्वात मोठी ई-कॉमर्स आणि रिटेल कंपनी ॲमेझॉन १०,००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. आधी मायक्रोसॉफ्ट, नंतर ट्विटर आणि त्यानंतर फेसबुकची मालकी असलेली मेटा या कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना कामावरून हटवले आहे. या कंपन्यांकडून अचानक झालेल्या नोकरकपातीमुळे सर्वांनाच धक्का बसला. त्यानंतर आता ॲमेझॉनही कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. या आठवड्यापासून कर्मचाऱ्यांना कामावरून हटवण्यात येईल. कंपनीला नुकसान सहन करावे लागत आहे. विक्रीमध्ये घट झाली आहे, त्यामुळे कंपनी खर्च करण्याच्या तयारीत आहे. अनेक कंपन्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अनेक कंपन्यांनी नोकरकपात करत कंपनीचा खर्च कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. ॲमेझॉन कंपनीमध्ये १६,०८,००० कर्मचारी आहेत.

**CHANGE IN NAME**

I SONALI MUKUND TANDLE DAUGHTER OF JC-325846L SUBEDAR MAJOR TANDLE MUKUND GINAYANDEO CHANGED MY NAME FROM SONALI MUKUND TANDLE TO SONALI TANDLE AFFIDAVIT NO. A7740/2022 DATED : 15/11/2022

### Tricom Fruit Products Ltd

Regd. Office: Gat No 336,338-341, Village AndoriTalukaKhandale, Shirval, Pandarpur Road, DistSatara- 415521.CIN L67120PN1995PLC139099

Amount in Lakh

| Particulars | Unaudited Quarter Ended on 30.09.2022 | Unaudited Quarter Ended on 30.09.2021 | Audited Year Ended 31.03.2022 |
|---|---|---|---|
| Total Income from Operation (net) | - | - | - |
| Net Profit/ (Loss) for the period from discontinuing operation (before tax, Exceptional and /or Extraordinary items) | (2.28) | (4.91) | (12.27) |
| Net Profit/ (Loss) for the period from discontinuing operation before tax(after Exceptional and/or Extraordinary items) | (2.28) | (4.91) | (12.27) |
| Net Profit/ (Loss) for the period from discontinuing operation after tax(after Exceptional and/or Extraordinary items) | (2.28) | (4.91) | (12.27) |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and other Comprehensive Income (after tax)] | (2.28) | (4.91) | (12.27) |
| Equity Share Capital | 1909.41 | 1909.41 | 1909.41 |
| Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Audited Balance Sheet of the previous year) | - | - | - |
| Earning Per share (of Rs.10/- each ) (for continuing and discontinued operations) 1. Basic: | (0.01) | (0.03) | (0.06) |
| 2. Diluted: | (0.01) | (0.03) | (0.06) |

**Note:**
The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with Stock Exchanges under Regulation 33 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of Standalone Financia Results is available on the website of the Company at www.tricomfruitproduts.com and on the website of Stock Exchange i.e. www.bseindia.com

For Tricom Fruit Products Ltd
sd/-
Chandrakant Josh
Managing Director (DIN: 08398213)

Place :- Mumbai
Date:- 14-11-2022

### जाहीर नोटीस

**बारामती येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात जिल्हा-पुणे**
**मे. श्री. इमरान ए आर मरछीया कोर्ट**

दि.कि.अर्ज १३३/२०२२
नि.०७

**१. शालन हनुमंत क्षिरसागर**
**२. रमेश उर्फ दादासाहेब हनुमंत क्षिरसागर**
दोघे राहणार - काळा ओढा, शिरवली,
ता. बारामती, जि. पुणे ...अर्जदार

**विरूध्द**

कोणी नाही ....जाबदेणार

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

ज्यापेक्षा मयत अनिल हनुमंत क्षिरसागर रा. मौजे माळेगांव बु।। ता. बारामती, जि. पुणे येथे ता. ०९ माहे ०२ सन २०२१ रोजी आणि मयत कुसूम हनुमंत क्षिरसागर या दि. २९/११/२०२१ रा. मौजे माळेगांव बु।। ता. बारामती, जि. पुणे येथे मयत झाले.

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी पुणे, पोट तुकडी व तालुका बारामती, मे. दुय्यम निबंधक सो. बारामती यांचे अधिकार कक्षेतील तसेच जिल्हा व जिल्हा परिषद पुणे, तालुका, व तालुका पंचायत समिती बारामती यांचे हद्दीतील गाव मौजे माळेगांव बु।। ता. बारामती, जि. पुणे सिटी सर्व्हे नं.१४२१ व सिटी सर्व्हे नं. १४२३ येथील मिळकती मयत अनिल हनुमंत क्षिरसागर हा अर्जाचा विषय आहे. तसेच मयत अनिल हनुमंत क्षिरसागर व मयत कुसूम हनुमंत क्षिरसागर यांच्या नावे मौजे शिरवली, ता. बारामती, जि. पुणे येथील मिळकत जमीन गट नं. १०९ (यासी सर्व्हे नं. २० (ब) क्षेत्र १३ हे. ४७ आर पैकी ०३ हे. ७४ आर या मिळकतीचा या अर्जाचा विषय असे.

परिशिष्टत वर्णन केलेली मिळकती विषयी अर्जदार हे एकमेव कायदेशीर वारस असल्याने अर्जदार यानी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ अन्वये हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांस जाहीर नोटिसीद्वारे कळविणेत येते की, सदर अर्जास हरकत असल्यास कारण दाखविण्याकरिता दिनांक २३/११/२०२२ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात व्यक्तीगत अथवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उपरोक्त दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल. तारखेस किंवा त्यापूर्वी बजावणीकरिता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दि. १५/११/२०२२ रोजी आमच्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
सही/-
हुकूमावरून
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व स्तर, बारामती

### केनरा बैंक Canara Bank
A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate
(भारत सरकारचा उपक्रम)

**एआरएम-२ शाखा, मुंबई :** ३ रा मजला, कॅनरा बँक बिल्डिंग, अदी मर्जबान स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१.
• **दूर. क्र. :** (०२२) २२६५११२८/२९, • **ई-मेल आयडी :** cb6289@canarabank.com

**विक्री सूचना**

**सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेमट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदीअंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिताची ई-लिलाव विक्री सूचना**

सर्व जनतेस व विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण खालील विवरणीत स्थावर मालमत्ता जिचा **प्रतिकात्मक ताबा** कॅनरा बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला होता, त्या मालमत्तेचे **मे. स्पाइरो लाईफकेअर प्रायव्हेट लिमिटेड,** बी-२०८/२०९, क्लासिक सेन्टर, प्लॉट क्र. २६, महाल इंडस्ट्रीअल इस्टेट, ऑफ महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पू.), मुंबई - ४०००९३, त्यांचे संचालक/हमीदार **श्री. संजीव अनंत गुप्ता, श्री. राजेश श्रीपाद घांगुर्डे, श्री. विनोद अनंत दली व श्री. हितेश परमानंद असरानी** यांच्या प्रतिनिधित्वांतर्गत, यांच्याकडून **कॅनरा बँक** एआरएम २ मुंबई शाखेस देय थकबाकी **रु. १७,३६,९२,४५२.१६ (दि. ३१.१०.२०२२ रोजीनुसार अधिक त्यावरील व्याज व मूल्य)** या रकमेच्या वसुलीसाठी दि. २१.१२.२०२१ रोजी **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे''** व **''जी काही आहे तेथे आहे'' तत्त्वावर** विक्री करण्यात येत आहे :

| मालमत्तेचे विवरण | राखीव मूल्य | इसारा रक्कम ठेव |
|---|---|---|
| मालमत्तेचा सर्व भाग व भूखंड व इमारतीचे मोजमापित १२००० चौ.मीटर, बिल्ट अप क्षेत्र, ३१३२.७३ चौ. मीटर, धारक स्थित प्लॉट क्र. एफ-१/२, एमआयडीसी जेजुरी, अतिरिक्त जेजुरी इंडस्ट्रीअल एरिया, शालिना लेबोलेटरीजवळ, जेजुरी निरा रोड, गाव जेजुरी, तालुका पुरंदर, जिल्हा पुणे- ४२१ ३०३, महाराष्ट्र. प्लान्ट व प्रतिष्ठापित मशिनरीसहित **मे. स्पाइरो लाईफकेअर प्रायव्हेट लिमिटेड** यांच्या नावे. | रु. **१०,१५,००,०००.००** | रु. **१,०१,५०,०००.००** |

इसारा रक्कम ठेव **दि. २०.१२.२०२२ रोजी सायं. ५.०० वा.** वा तत्पूर्वीपर्यंत जमा करावी. इरठेची माहिती व इतर कागदपत्रे **दि. २०.१२.२०२२ रोजी सायं. ५.००** तत्पूर्वीपर्यंत सर्विस प्रदात्यांकडे जमा करता येतील. दस्तावेज जमा करण्याची तारीख **दि. २०.१२.२०२२ रोजी सायं. ५.०० वा.** अशी आहे. प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या पूर्वभेटनिश्चितीद्वारे मालमत्तेचे **दि. १६.१२.२०२२** रोजी परीक्षण करता येऊ शकेल. विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तीकरिता कृपया कॅनरा बँकेच्या वेबसाइटवर (www.canarabank.com) दिलेली **''ई-ऑक्शन''** लिंक पाहावी किंवा **श्री. पारितोष कुमार, मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बँक, एआरएम २ शाखा, मुंबई** (दूर. क्र. (०२२) - २२६५११२८/२९, मोबा. नं. ८८२८३२८२९७) वा. श्री. स्मित जैसवाल, व्यवस्थापक (मोबा. नं. ७२२३००२२७२), ई-मेल आयडी : cb6289@canarabank.com यांना कोणत्याही कार्यदिवशी कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा किंवा सेवा प्रदाते **मे. सी१ इंडिया प्रा. लि.,** उद्योग विहार, फेज - २, गल्फ पेट्रोकेम बिल्डिंग, इमारत क्र. ३०१, गुरगाव, हरयाणा - १२२ ०१५ **श्री. हरेष गोवडा मोबा. क्र. ९५९४५९७५५५ (संपर्क क्र. + ९११२४४३०२०२०/२१/२२/२३/२४), support@bankeauctions.com, hareesh.gowda@c1india.com** येथे संपर्क साधावा.

दिनांक : १४.११.२०२२
ठिकाण : मुंबई

प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक, एआरएम-२ शाखा

'डॉयरेक्टर ऑफ क्रिकेट'पदी नियुक्त करणार

## बीसीसीआयमध्ये धोनीची एंट्री !

दिल्ली. आयसीसी टूर्नामेंटमध्ये वारंवार अपयश आल्यानंतर भारतीय क्रिकेट बोर्ड आता ॲक्शन मोडमध्ये आली आहे. बीसीसीआयने माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीला भारतीय क्रिकेटमध्ये मोठी भूमिका देण्याची योजना आखली आहे. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बोर्ड धोनीला भारतीय क्रिकेटमध्ये कायमस्वरूपी भूमिकेसाठी बोलावण्याचा विचार केला आहे. धोनीला डॉयरेक्टर ऑफ क्रिकेट पदी नियुक्त केले जाऊ शकते. प्रशिक्षक राहुल द्रविडला तिन्ही फॉरमॅटचे व्यवस्थापन करण्याचा भार खूप आहे त्यामुळे बीसीसीआय प्रशिक्षकपदाची भूमिका विभाजित करण्याचा विचार करत आहे.



### वेगवेगळेच संघ हवेत



विश्वचषकातील टीम इंडियाच्या अपयशातून आपण आताच धडा घ्यायला हवा. आताच्या वेगवान खेळाच्या युगात टीम इंडियानेही टी-२०, वन डे (व्हाईट बॉल) आणि कसोटी (रेड बॉल) क्रिकेटसाठी दोन वेगवेगळे संघ आणि प्रशिक्षक स्टाफ नेमायला हवेत. आपण त्यासाठी इंग्लंडकडून धडा घ्यायला हरकत नाही. संघाला विजयासाठी अधिकाधिक तज्ञ आणि अष्टपैलू क्रिकेटपटूंची आवश्यकता असते. बीसीसीआयनेही या पद्धतीने संघाची विभागणी आणि बांधणी करावी. इंग्लंड आणि माजी ऑस्ट्रेलिया संघांत अष्टपैलू क्रिकेटपटूंचा मोठा भरणा आहे.

**- अनिल कुंबळे , माजी क्रिकेटपटू**

धोनीचा २० फॉरमॅटमध्ये समावेश करून भारतीय क्रिकेट संघाचा स्तर उंचावण्याची जबाबदारी बोर्ड देऊ शकते. अहवालानुसार, या महिन्याच्या अखेरीस सर्वोच्च परिषदेच्या बैठकीत या विषयावर चर्चा केली जाणार आहे.

**बैठकीत होणार शिक्कामोर्तब**

एमएस धोनी युएईमधील टी-२० विश्वचषक २०२१ दरम्यान संघासोबत काम केले पण तो अंतरिम भूमिकेत होता. जवळपास आठवडाभराचा सहभाग असूनही, निकाल अपेक्षेप्रमाणे लागला नाही. भारतीय संघ सुरुवातीच्या फेऱ्यांमध्ये बाद झाला. विराट कोहलीच्या नेतृत्वाखाली भारताला पाकिस्तान आणि न्यूझीलंडकडून पराभव पत्करावा लागला होता. बीसीसीआयला वाटते की धोनीच्या मोठ्या भूमिकेमुळे भारतीय टी-२० मध्ये निश्चितपणे मदत होईल. पुढील वर्षी होणाऱ्या आयपीएलनंतर धोनी खेळातून निवृत्त होणार असल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. बीसीसीआय त्याच्या अनुभवाचा आणि तांत्रिक कौशल्याचा योग्य वापर करण्यास उत्सुक असून यामध्ये भारताच्या माजी कर्णधाराचाही समावेश असेल.

### सलामीलाच नदाल पराभूत

**तुरीन.** अमेरिकन टेनिसपटू टेलर फ्रिट्जने एटीपी फायनल्सच्या पहिल्याच दिवशी सलामी सामन्यात विजयाची नोंद केली. त्याने पुरुष एकेरीच्या सलामी सामन्यात अव्वल मानांकित राफेल नदालवर मात केली.

**PUBLIC NOTICE**

(LMV - TR) **Make - Maruti Swift Dzire, Reg Number - MH12 KE 7472**, owned by late **Mrs. Bindu George** (Date of death - 27/04/2018) is proposed to be transferred to **Mrs. Gracy Mathew George**. Any objection to the transfer of the said vehicle, may contact on **Mobile No. 9833881004 Add.:** Runwal Seagull, Flat No. 1003, B3-BLDG, Handewadi Road, Near Ganga Village, Hadapsar, Nr Ganga Orchids, Pune - 411028. within 15 days of the date of the Notice. Dated : 15/11/2022.

### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र. १, पुणे
**ई-निविदा सूचना क्र. ३० सन २०२२-२३**

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत खालील कामाची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१, पुणे यांचेकडून मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | तालुका | जिल्हा | अंदाजित किंमत रु. |
|---|---|---|---|---|
| १ | राख पाणी पुरवठा योजना | पुरंदर | पुणे | ७,५१,४३,६७१ |
| २ | दौंडज पाणी पुरवठा योजना | पुरंदर | पुणे | ५,८७,४३,४२७ |
| ३ | वाघदरवाडी पाणी पुरवठा योजना | पुरंदर | पुणे | ५,१९,१४,७३८ |
| ४ | कुरकुंभ पाणी पुरवठा योजना | दौंड | पुणे | १२,५१,७८,६३८ |
| ५ | देलवाडी पाणी पुरवठा योजना | दौंड | पुणे | ५,९६,५०,४३० |
| ६ | हातवळण पाणी पुरवठा योजना | दौंड | पुणे | ४,१२,३४,९१३ |
| ७ | दहिटने पाणी पुरवठा योजना | दौंड | पुणे | ३,३५,१९,९२४ |
| ८ | मलठण पाणी पुरवठा योजना | दौंड | पुणे | ५,६३,८४,५७७ |
| ९ | वाघळे पाणी पुरवठा योजना | शिरुर | पुणे | ११,९५,८५,२३० |
| १० | हिवरे पाणी पुरवठा योजना | शिरुर | पुणे | ५,१४,९८,२६८ |
| ११ | जातेगांव पाणी पुरवठा योजना | शिरुर | पुणे | १३,८९,८९,८८३ |
| १२ | उरळगांव पाणी पुरवठा योजना | शिरुर | पुणे | ५,२५,१४,४७२ |
| १३ | चिंचोली मोराची पाणी पुरवठा योजना | शिरुर | पुणे | १४,१४,२९,००७ |
| १४ | विठ्ठलवाडी पाणी पुरवठा योजना | शिरुर | पुणे | ७,०८,३४,६१३ |

सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १६.११.२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

**दिनांक : ०७.११.२०२२**

सही/-
(एन. एन. भोई)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१, पुणे ४११००१

डीजीआयपीआर २०२२/२०२३/४०३०

## फुटबॉल वर्ल्डकपचा २० नोव्हेंबरपासून थरार

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. कतारमध्ये येत्या रविवारपासून (२० नोव्हेंबर) फुटबॉल वर्ल्डकपचा थरार सुरू होत आहे. स्पर्धा तोंडावर येऊन ठेपल्याने 'फिफा' आणि स्पर्धा आयोजकांची सध्या लगीनघाई सुरू आहे. एखाद्या अरब देशात प्रथमच फुटबॉलच्या वर्ल्डकपचे आयोजन होत असून या स्पर्धेत ३२ देशांचे संघ कौशल्य पणाला लावण्यासाठी सज्ज झाले आहेत. काही संघ कतारमध्ये डेरेदाखल झाले असून, फुटबॉल शौकिनांचेही आगमन व्हायला सुरुवात झाली आहे. अरब देशात प्रथमच फुटबॉलचा वर्ल्डकप रंगणार असल्याने येथील कठोर नियमांमुळे या स्पर्धेचे आयोजन काही प्रमाणात वादग्रस्त ठरले. स्पर्धेसाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. यजमान कतार आणि इक्वाडोर यांच्यातील लढतीने या फुटबॉल विश्वातील सर्वोच्च महोत्सवास प्रारंभ होणार आहे. फुटबॉल वर्ल्डकपमध्ये यंदा काही नवीन गोष्टी घडणार आहेत. यावेळी तीनऐवजी पाच बदली खेळाडू वापरता येणार आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर जूनमध्ये हा नियम करण्यात आला होता, तो यंदाच्या वर्ल्डकपमध्ये प्रथमच वापरला जाणार आहे. लढत अतिरिक्त वेळेत गेल्यानंतरही संघाला एक खेळाडू बदलता येणार आहे.

### मे. जिल्हा अधीक्षक,भुमी अभिलेख पुणे यांचे कोर्टात
**जाहिर नोटीस (नमुना एन. ३)**

या नोटीसद्वारे १) श्री. चंद्रमोहन कृपाराम सैगल, २) श्री. माहेन कृपाराम सैगल ३) श्री. रामप्रकाश कृपाराम सैगल (मयत), श्रीमती संतोष रामप्रकाश सैगल (मयत) तर्फे वारस म्हणुन ३अ) श्री. राजु रामप्रकाश सैगल, ३ब) सौ. गिता ओमप्रकाश लोंगानी (लग्नाअधिचे नाव गिता रामप्रकाश सैगल), ३क) सौ. आशू दिनेश सेठ, (लग्नाअधिचे नाव आशू रामप्रकाश सैगल), ४) सौ. शिला लजपतराय खत्री (मयत) (लग्नाआधिचे नाव शिला कृपाराम सैगल) तर्फे वारस म्हणून , ४अ. गुलशन लजपतराय खत्री, ४ब. नंदु लजपतराय खत्री, ४क. गंगा लजपतराय खत्री, ४ड. जमना लजपतराय खत्री, ५) पद्मा यशवंत अवसरे, (लग्नाआधिचे नाव पद्मा कृपाराम सैगल) ६) राणी रमन व्होरा (मयत), (लग्नाआधिचे नाव राणी कृपाराम सैगल), तर्फे वारस म्हणून, ६अ. रमन व्होरा, ६ब. सुमित रमन व्होरा, सर्व राहणार पत्ता :- एच.बी. १३/८, सिटी सर्वे नं. २३८४, जय प्लाझा, साई चौक, पिंपरी, पुणे. ४११ ०१७, यांना कळविण्यात येत की, जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे या कार्यालयात १) ॲड. रामकिशन नानक सैगल व २)डॉ. पुजा गुरमितसिंग भाटीया (लग्नाआधिचे नाव कु. पुजा नानक सैगल), पत्ता :- एच. बी. १३/८, सिटी सर्वे नं. २३८४, जय प्लाझा, फ्लॅट न. ३, साई चौक, पिंपरी, पुणे. ४११ ०१७. यांनी आपणाविरूध्द मौजे गांव मौजे पिंपरी सिटी सर्वे नं. २३८४ शिट न. १३५, यासी क्षेत्र २०७.८६ चौ. मी. या मिळकतीबाबत दिनांक ३१/०१/२०२२ रोजी अपिल अर्ज ५४८७/२०२२ दाखल केले आहे. त्याबाबत आम्ही आपल्याला नोटीस काढली होती. मात्र आपण सदर सुनावणीस सतत गैरहजर असलेने / पत्ता व्यवस्थीत सापडत नसलेने आपणांस या नोटीसीने कळविण्यत येते की, अपिल क्र. ५४८७/२०२२ मध्ये सुनावणीची पुढील तारीख दिनांक ०६/१२/२०२२ वेळ सकाळी ११ वाजता नेमणेत आलेली आहे. तरी श्री. चंद्रमोहन कृपाराम सैगल व इतर यांनी अथवा त्यांचे हितसंबधीतानी सदर सुनावणी तारखेस जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे (बदामी चौक, बंगला न. १ येरवडा, पुणे ०६) यांचे कार्यालयत हजर रहावे अन्यथा आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणीची कार्यवाही करणेत येईल यांची नोंद घ्यावी.

**स्थळ :-** पुणे, **दिनांक :-** १४/११/२०२२

शिक्का
सही/-
सुर्यकांत मोरे
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे

## मेरी कोम, सिंधूला संधी

दिल्ली. पाच वेळा विश्वविजेती ठरलेली मेरी कोम, दोन वेळा ऑलिंपिक पदकविजेती ठरलेली सिंधू यांच्यासह भारताच्या दहा खेळाडूंची भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या ॲथलीट आयोगात वर्णी लागली आहे. दहा जागांसाठी दहा खेळाडूच या निवडणुकीला उभे राहिले होते. त्यामुळे या सर्वांचीच बिनविरोध निवड झाली आहे. निवडून आलेल्या दहा खेळाडूंमध्ये पाच महिला खेळाडूंचा समावेश आहे. तसेच दहाही खेळाडू ऑलिंपियन आहेत. मेरी कोम, सिंधू यांच्यासह टोकियो ऑलिंपिकमध्ये रौप्यपदक जिंकणारी वेटलिफ्टर मीराबाई चानू, हॉकीपटू रानी रामपाल, तलवारबाज भवानी देवी या महिला खेळाडूंचा समावेश आहे. पुरुष खेळाडूंमध्ये हिवाळी ऑलिंपियन शिवा केशवन, ऑलिंपिक ब्राँझपदक विजेता नेमबाज गगन नारंग, अनुभवी टेबलटेनिस खेळाडू अचंता कमल, रोईंग खेळाडू बजरंग लाल आणि माजी गोळाफेक खेळाडू ओ. पी. करहाना यांचा समावेश आहे.



### महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
**ई-निविदा सुचना क्रमांक. २६ सन २०२२-२०२३**

**राज्य पाणी व स्वच्छता मिशन (SWSM) यांचेमार्फत वर्ग ब मध्ये Empanelled झालेल्या कंत्राटदारांकडून जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत खालील पाणी पुरवठा योजनांच्या एकत्रित कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र. २ पुणे यांच्याकडून मागविण्यात येत आहेत.**

| अ.क्र | योजनेचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १. | ओतुर नळ पाणी पुरवठा योजना तालुका - जुन्नर, जिल्हा - पुणे | रु. २३,७५,१९,९२९/- |
| २. | वारुळवाडी नळ पाणी पुरवठा योजना तालुका - जुन्नर, जिल्हा - पुणे | रु. २४,२९,०१,९२९/- |

योजनेचा सविस्तर तपशील दिनांक १६.११.२०२२ पासून www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**दिनांक १६.११.२०२२**

सही/-
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग.२, पुणे.

डीजीआयपीआर २०२२/२०२३/४०२९

### सांगोले नगरपरिषद, सांगोले जिल्हा - सोलापूर

आज़ादी का अमृत महोत्सव

दुरध्वनी क्रमांक 02187 gmail.221174/220018 टोल फ्री क्र. 18002332190
E-mail : comcsangola@gmail.com, coud.sangola@maharashtra.gov.in
जा.क्र/२२/आरोग्य विभाग/आर.आर/कावि ४२४१ दिनांक १४/११/२०२२

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणाकरिता नगरपरिषदेला मदत करण्याकरीता एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात केवळ ११ महिन्यासाठी शहर समन्वयक (City Co-Ordinator) यांची नियुक्ती करावयाची आहे. खालील नमूद केलेले कंत्राटी पद भरण्याकरीता दिनांक १६/११/२०२२ ते २२/११/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नगरपरिषद, सांगोला जि.सोलापूर येथे विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह सीलबंद लिफाफ्यात स्वीकारण्यात येणार आहेत. सदरचे अर्ज सांगोला नगरपरिषदेमधील आरोग्य विभागात पहावयास मिळतील.

तरी इच्छुक/ पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक, अनुभव प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रांसह विहीत मुदतीत अर्ज सादर करावेत.

| अ. क्र. | भरावयाच्या पदाचे नाव | एकुण पदे | एकत्रित मासिक मानधन (सर्व कपातीसह) | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | अर्ज सादर करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शहर समन्वयक (City Co-Ordinator) | ०१ | ४५,०००/ (पंचेचाळीस हजार रूपये) | 1. मान्यता प्राप्त विद्यापिठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी अ) बी.ई./बी.टेक.(कोणतीही शाखा) आ) बी.आर्क क) बी.प्लॅनिंग **२. अनुभव** अ) स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान सहा महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. ब) शहर समन्वयक (City Co-Ordinator) चा अनुभव क) शहर समन्वयक (City Co-Ordinator) च्या व्यतिरिक्त स्वच्छ सर्वेक्षण/ घनकचरा व्यवस्थापन/ पर्यावरण विभागात कामाचा अनुभव. | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक (City Co-Ordinator) म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथील करता येईल.) | दि. १६ नोव्हेंबर २०२२ ते २२ नोव्हेंबर २०२२ पर्यंत |

**टीप:** सदर पदाकरीता विहीत नमुन्यातील अर्ज, फॉर्म व इतर माहिती कार्यालयीन वेळेत आरोग्य विभागाकडून प्राप्त करून घेता येईल.

**शर्ती व अटी :** १) प्राप्त होणारे अर्ज एक अथवा सर्व कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
२) अर्जदाराच्या कोणत्याही शर्ती किंवा अटी मान्य करता येणार नाहीत.

शिक्का
सही/-
मुख्याधिकारी
नगरपरिषद सांगोला